**ज्ञानी----------!!!!!!**

मूर्ख तो, जो समजतो,

वय जसे वाढत असते,
म्हातारपण, वाढत असते,
प्रेम उतरकळीत असते,
मित्रत्व, अंतरत असते,
नाते सबंध थिजत असते.

मूर्ख तो, जो समजतो,

बाल्य विसरायचे असते,
तारुण्य हरवायचे असते,
प्रौढत्व हिरवळायचे नसते,
म्हातारपण जगायचे नसते,
मरण कधी विसरायचे नसते.

मूर्ख तो, जो समजतो,

मोजून मापूनच खायचे असते
कोण्णाला नकळत प्यायचे असते,
खालमुंडीत, पाताळ धुंडायाचे असते,
ताकाला जाता, भांडे लपवायचे असते.

ज्ञानी तो, जो समजतो.

प्रत्येक क्षण जगायचे असते,
वय विसरून जगायचे असते,
मनाचे ऐकून जगायचे असते,
हसत हसतच जगायचे असते,
मरण विसरून जगायचे असते.

**डॉ. विनोद अडबे**